संं.फौ.ख.क्रं. ९८१/२०२१
सरकार –वि– महादेव बोदडे
नि.क्र. २४ खाली

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–
माझे नाव — मनोहर किसन कळस्कार,
वय. ६८ वर्षे, व्यवसाय — शेती,
राहणार – जवळा पळसखेड, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सरकारी वकील.</u>**

१. न्यायालयात अनुपस्थीत असलेल्या आरोपीला मी ओळखतो. पोलीसांनी मला पंच म्हणून फाट्यावर बोलविले होते. पोलीसांनी माझी सही घेतली होती. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. १ म्हणुन माझी सही आहे. त्यामधील मजकुर मला माहित नाही. त्याला सहीपुरता **नि.क्र.२५** देण्यात येतो. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले नव्हते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता त्यांना परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला दि. २९.०९.२०२१ रोजी ग्राम जवळा पळसखेड फाट्याजवळ पंचनामा करण्यासाठी पंच म्हणून बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांसोबत तेथे गेलो असता आरोपी देशी दारुची विक्री करतांना मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष आरोपीच्या ताब्यातील थैलीची पोलीसांनी पाहणी केली असता त्याच्या थैलीतून देशी दारु संत्रा ५००० कंपनीच्या १८० मि.ली. च्या ९ शिश्या मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष मुद्देमाल जप्त करुन त्यामधून एक शिशी रासायनिक विश्लेषणासाठी वेगळी काढून सिल केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, संपूर्ण कारवाईबाबत पोलीसांनी माझा बयाण नोंदविला होता. माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग – अ पोलीसांनी खोटा लिहिला व तो पोलीसांनी खोटा का लिहिला याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जवळा पळसखेड येथे राहतो व मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या समक्ष आरोपीविरुध्द कोणतीही

कारवाई करण्यात आली नसल्याची मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. बी. एस. शेगोकार, वकील यांनी नाकारला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि. २५.०६.२०२५ | दि. २५.०६.२०२५ |